Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P009
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय शिक्षणप्रणाली व कोविड -१९ वर झालेला परिणाम

**: शोधार्थी:**
**प्रा.अमिता कृ.महातळे**
(CHB). राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**शब्दकुंजी** कोविड-१९, अफवा, अंधश्रद्धा, सोशल मीडिया, ताळेबंदी. परंपरा, विश्वास, ज्ञान.

**प्रस्तावना**

करोना महामारीमुळे जगातील संपूर्ण लोकांचे जीवन काही काळासाठी थांबले होते. या विषाणूचा संसर्ग होऊ नये याकरिता शासनाकडून 'सोशल डिस्टन्स' या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा आदेश देण्यात आला होता. तात्काळ ताळेबंदी झाल्याने त्याचा गंभीर परिणाम लोकांच्या सामाजिक, आर्थिक तसेच आरोग्य विषयक बाबीवर झालेला होता. या निर्णयाचा परिणाम शैक्षणिक क्षेत्रावर झालेला दिसून येते. लोकांच्या दिनचर्यमध्ये अचानक बदल झाला होता. विद्यार्थ्यांचे शाळा, कॉलेज बंद झाले. लोकांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांवर, कामधंद्यावर, व्यवसाय, नोकरीवर देखील विपरीत परिणाम पडला होता. अशा परिस्थितीत लोक स्वतःच्या घरातच बंदिस्त झाली होते. हा काळ अनिश्चिततेचा होता. तसेच अशा भीतीयुक्त, धोकादायक आयुष्याचा अनुभव याआधी लोकांनी कधीच अनुभवला नव्हता. प्रत्येक नवीन उगविणारा दिवस हा नवा प्रश्न, अडचणी घेऊन यायचा. आज काय होणार ?,आज घराबाहेर पडायचे की नाही ?, नोकरी टिकेल की नाही ?, यांसारख्या अनेक अडचणी समोर येत होत्या अशा विचलित करणाऱ्या वातावरणात अनेक लोक अंधश्रद्धा, गैरसमजुती, अफवा यावर विश्वास ठेवू लागले होते. कोविड काळात चुकीची माहिती, अफवा, अंधश्रद्धा पसरू नये याकरिता भारतीय शास्त्रज्ञांचा प्रतिसाद (ASRC) या संस्थेच्या "होअक्स बस्टर्स" (Hoax buster) आणि डॉ. अनामिका रे मेमोरियल ट्रस्ट (ARMT) यांच्या "इन्फोडेमिक विरुद्ध पॅडेंमिक" या दोन जनजागृती मोहीम राबविण्यात आल्या. अशा प्रकारचे उपक्रम लोकांमध्ये योग्य माहिती पुरविण्याकरिता उपयोगी ठरतात.( Ankuran Datta). शास्त्रज्ञ, डॉक्टर तसेच माध्यमांनी योग्य ती माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला होता. प्रत्येक अफवा तसेच अंधश्रद्धा ,गैरसमजुती याबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच योग्य माहिती पुरविली जात होती. भारत सरकारने जनतेने सुरक्षित रहावे याकरिता मास्क वापरणे, सामाजिक अंतर ठेवणे, वारंवार हात धुणे यासारख्या सवयींचे जनतेने अंगीकार करावा याकरिता जनजागृती केली होती. सरकारकडून वेळोवेळी आवश्यक ती माहिती, मार्गदर्शक तत्वे आणि मदत मिळत होती या सर्व कारणांमुळे लोक सुरक्षित राहिले होते. परंतु दुर्दैवाने या महामारीच्या काळात 'खोट्या बातम्या', 'माहिती', व 'अफवांचा महापूर' आला होता. सोशल मीडिया माध्यमाद्वारे चुकीची माहिती देणारे, अंधश्रद्धा व गैरसमजुतीच्या प्रचार व प्रसार करणाऱ्या अनेक बातम्याचा महापूर आला होता. भारताच्या सामाजिक संरचनेमध्ये पूर्वीपासून अंधश्रद्धा गैरसमजुती याचे वर्चस्व असल्याचे अध्ययनात येते. उदाहरणार्थ वाईट नजरेपासून वाचविण्याकरिता घराला, गाडीला, दुकानाला लिंबू -मिरची लटकविणे, राक्षसाचा चेहरा लावणे, काळ्या रंगाची बाहुली लटकवणे, मांजर आडवे गेल्यास मागे फिरणे तसेच १३ अंकाला अशुभ मानणे यासारखे अनेक गैरसमज आजही अनुभवयास मिळते. या आणि अशा समजुती व गैर समजुती भारतीय परंपरांशी जोडल्या असून त्या सामान्यजणांच्या ज्ञानाचे(अंधश्रद्धा) स्त्रोत आहे.

कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराला कोणतेही प्रतिबंधात्मक लस व औषधोपचार उपलब्ध न झाल्याने लोकांमध्ये निराशा उत्पन्न झाली होती. या काळात त्यांना योग्य मार्गदर्शन व मदतीची गरज होती. परंतु वास्तविकतेत खोट्या बातम्या, अंधश्रद्धा व अफवा अधिक प्रमाणात अनुभवास मिळाले होते. कारण या गंभीर परिस्थितीत लोक अतिशय घाबरलेले असल्याने अफवा, गैरसमज, अंधश्रद्धा यावर विश्वास ठेवण्यास सुरुवात केली होती. अंधश्रद्धा व अफवा या विषयाबाबत चर्चा करण्या अगोदर आपणास हे ध्यानात घ्यायला हवे की भारत देशाने 'माहिती व तंत्रज्ञान'(ICT) यात प्रचंड विकास केलेला आहे. या संसर्गजन्य विषाणूच्या काळात सोशल मीडियावर मेसेजिंग ॲप्स वरून अनेक खोट्या बातम्या लोकांनी शेअर केल्या होत्या व त्यावर सहज विश्वास ठेवत गेले होते. समाजातील प्रतिष्ठित आणि विश्वासार्ह असणाऱ्या लोकांचाही अफवा, गैरसमज पसरविण्यात सहभाग होता. त्यामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांनी त्यावर सहज व अधिक विश्वास ठेवला होता. भारताचे आयुष राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी असा दावा केला होता की प्रिन्स चार्लस ने जडीबुटीच्या उपचाराने कोरोनाव्हायरस सारख्या विषाणू पासून स्वतःचे संरक्षण केले होते. परंतु प्रिन्स चार्लस यांनी हे सर्व दावे फेटाळून लावले व त्यांनी डब्ल्यू.एच. ओ. यांनी सांगितलेल्या मानक आरोग्य मार्गदर्शक तत्त्वाचे पालन केल्याचे स्पष्ट केले होते (Ankuran Dutta June 2020). ब्राझीलच्या धर्मोपदेशकाने कोविड विरुद्ध 'संयम दिवस'पाडण्याचे आव्हान करणारी जाहिरात केली होती तसेच त्यांच्या दावा होता की उपवास केल्याने चमत्कार घडेल आणि देशाला या संसर्गजन्य विषाणूपासून वाचवता येईल (Ankuran Dutta June 2020).

रसायनशास्त्रत पी.एच.डी.असलेल्या टांझाणीयाच्या राष्ट्रपतीं जॉन पॉम्बे मॅग्यूफुली यांनी प्रयोग शाळेतील उपकरणावर शंका व्यक्त केली होती. विषाणू वर हर्बल उपाय करण्याचे आदेश दिले होते. या आजाराचा प्रादुर्भाव शैतानी अजून लोकांनी चर्चमध्ये जात राहण्याचा सल्ला दिला होता या मागचा उद्देश लोकांनी असे केल्यास कोरोनाचा विषाणू ख्रिस्ती लोकांच्या शरीरात प्रवेश करू शकणार नाही तसेच टिकून राहणार नाही तर तो विषाणू जळून खाक होईल असे सांगितले (Ankuran Dutta June2020). व्हेनेझुएलाच्या राष्ट्रपतीं निकोलस मॅड्यूरोनी जनतेसमोर असा प्रस्ताव मांडला होता की 'लेमन ग्रास' व 'एल्डरबेरी चहा'याचे प्राशन केल्याने कोरोना विषाणूला दूर करू शकतो**.** अशा प्रकारचे अनेक उदाहरणे या महामारीच्या काळात अनुभवास मिळाले होते अशा प्रकारचे अनुभव भारत देशात देखील अनुभवास मिळाली आहेत. अनेक प्रभावी

व्यक्तींच्या वक्तव्यावर सर्वसामान्य जनतेने सहज विश्वास ठेवला होता. त्याचे अनुकरण सुद्धा दैनंदिन जीवनात करण्यास सुरुवात केली होती. या महामारीच्या काळात भारतात देखील अनेक समजुती व गैरसमजुती पसरल्या होत्या त्या खालील प्रमाणे आहे.

**धार्मिक विधी, संस्कृती व परंपरावाद सिद्धांत**

कोरोना या जागतिक महामारीच्या काळातील अज्ञान, अंधश्रद्धा, श्रद्धा, गैरसमजुती व समजुती यांचा व संस्कृती,परंपरागत सिद्धांत यांच्यातील सह-संबंध अनुभवास मिळाले होते. कोविड सारख्या गंभीर आजारावर वैज्ञानिक उपचार व लसीकरण गरजेचे होते परंतु या काळात काही ठिकाणी लोकांनी घरगुती उपाय, आयुर्वेदिक उपाय, यावर जास्त भर दिला होता. परंपरागत सिद्धांत हे असे सिद्धांत असतात जे अनेक पिढ्यांपासून चालत आलेले असतात आणि विशिष्ट क्षेत्रात किंवा समाजात प्रचलित असलेल्या विचारधारांवर आधारित आहे. परंपरावाद म्हणजे एखादी व्यक्तीचा आपल्या समाजातील समूह नियम आणि मूल्य यावर अतिशय विश्वास असून त्यांना अधिक महत्त्व देतात आणि त्यामध्ये बदल करण्यास त्यांचा सक्त विरोध असतो(Theodore Samore,2023). हे सिद्धांत आधुनिक संशोधनापेक्षा अनुभव, परंपरा, धार्मिक, सांस्कृतिक किंवा सामाजिक तत्त्वावर अधिक अवलंबून असतात. परंपरागत सिद्धांत हे एखाद्या क्षेत्रातील दीर्घकाळापासून चालत आलेले, मान्यताप्राप्त आणि अनुभवावर आधारित असे विचारसरणीचे तत्वज्ञान किंवा नियम असतात. परंपरा, अनुभव, समाजातील आचरण, धार्मिक किंवा सांस्कृतिक मूल्यावर आधारित असतात (Theodore Samore,2023).याचा अनुभव या संसर्गजन्यसाथीच्या काळात आला होता.

अनेक समुदाय आपल्या समुदायाचे संरक्षण या जिवाणूपासून करण्याकरिता स्वतःच्या धार्मिक व पारंपारिक पद्धतीने विधी करीत असल्याचे दिसून आले होते. उदाहरणार्थ नारळाच्या शेंडी मध्ये कडू लिंबाचे पान ठेवून ते गावा बाहेर लिंबाच्या झाडाखाली ठेवली जात होती. या मागील गावातील लोकांची अशी श्रद्धा होती की असे केल्याने कोरोना सारखे वाईट शक्ती गावात प्रवेश करू शकणार नाही(DHNS,2020).

गावातील एका महिलेने ती जो धार्मिक विधी करीत होती त्याबद्दल स्पष्ट केले की तिला तिच्या नातेवाईकांकडून व्हाट्सअपद्वारे एक संदेश मिळाला होता. तो संदेश असा होता की प्रत्येक भावंडासाठी एक दिवा लावावा जेणेकरून कोविड या विषाणूचा संसर्ग होणार नाही. तसेच पुढे त्या महिलेने सांगितले की भावंडांच्या संख्येनुसार विहिरीत तितक्या बादल्या पाणी टाकायचे. महिलेने प्रत्येक भावंडाच्या नावे दिवे लावली होती व प्रत्येक भावाच्या नावाने विहिरीत तितक्या बदल्या पाणी टाकायचे मी हा सर्व विधी केला व आपल्या कुटुंबाला या संसर्गजन्य विषाणूपासून संरक्षण करण्याचा प्रयत्न केला असा दावा महिलेने केला होता (Sharma, 2020).

काही लोकांच्या असाही विश्वास होता की ही महामारी अल्हाने त्यांच्या श्रद्धेची घेतलेली परीक्षा आहे तर काहीजण याला अल्हाचा दैविक राग, कोपाचे प्रतीक मानत होते (Abderrahmani,2020). ह्या सोशल मीडियावर पसरलेल्या असंख्य अफवा व गैरेसमजूतीपैकी केवळ काही अफवा व गैरसमजुतीची उदाहरणे आहेत. बरेचदा एखादा संदेश ही अफवा आहे किंवा धार्मिक श्रद्धेवर आधारित आहे हे समजणे कठीण होते. मात्र वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केल्यास अशा संदेशांचे विश्लेषण करणे सोपे जाते परंतु त्यावर विश्वास ठेवायचा किंवा नाही, हे ठरविणे मात्र कठीण होते!

धार्मिक लोकांच्या भविष्यवाण्यांनी भरलेले व्हिडिओ आणि संदेश सोशल मीडियावर अपलोड होत होते. या व्हिडिओज व संदेशामध्ये कोविड-१९ विरुद्ध विविध प्रकारचे संरक्षणात्मक उपाय सांगण्यात येत होते. काहीजण या विषयांवर उपाय म्हणून गोमूत्र, ब्लिच, तसेच कोकेन वापरण्याची शिफारस करत असल्याचे दिसून येते (Tasnism Samia). बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगाल सारख्या भारतातील काही भागात कोरोना पासून मुक्त होण्यासाठी "कोरोना देवीची" पूजा करण्यासाठी एकत्र येण्यास सुरुवात केले जेणेकरून त्यांना कोरोना पासून मुक्ती मिळेल. मृत्यूच्या भीतीवर मात करण्यासाठी काही लोकांनी बळी दिले. पश्चिम बंगालमधील काही गावामध्ये' 'शीलनरा'या वस्तूची मातेच्या रूपात 'माता षष्ठी' म्हणून पूजा केली. शीलनारा म्हणजे पाटा व वळवंटा होय पश्चिम बंगालमध्ये त्याला शीलनरा असे म्हटले जाते. शील-सपाट दगड व नरा-हातात धरून वापरला जाणारा लांब गोल दगड ज्याने मसाला घासला जातो. म्हणजेच दगडी वाटण करण्याचे एक साधन. (Dr.Naskar SS,Dr.Nags13, Nov2024).काही व्हिडिओ मध्ये असे दाखविण्यात आले की हा संसर्गजन्य आजार 'ट्रान्सजेंडर' महिलेच्या शापाचा प्रभाव आहे तर काही व्हिडिओमध्ये निसर्गाने मानव जातीवर मांसाहारी अन्न सेवन केल्याबद्दल घेतलेल्या सूड असल्याचे सांगितले आहे. एका व्हिडिओमध्ये एक व्यक्ती कबुतराच्या पोटाच्या आतील थराचे सूप करण्याची शिफारस करीत असल्याचे आहे तर दुसऱ्या व्हिडिओ मध्ये देवस्थानातील धूड खाल्ल्याने कोरोना संक्रमित लोकांसाठी कसे लाभदायक आहे हे स्पष्ट केले आहे (TRT World 2021). अफवा,अंधश्रद्धा पसरविण्यामागे केवळ अज्ञान हे कारण नसते तर काही लोकांचा स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्याचा उद्देश असतो. डिजिटल युगातील असाही एक गट आहे जो चुकीच्या माहितीचा प्रसार व प्रचार करून स्वतःचा पैसा कमविण्याचा प्रयत्न करतो या गटाला "होमो डिजिटल" (homo digital) असे संबोधण्यात येते. तर दुसरा गट हा चुकीच्या बातम्या, अफवा तसेच इतरांना त्रास देण्यात आनंदी असतो अशा गटाला "प्रोशुमर"(prosumer)असे म्हणतात. त्यांचा उद्देश माहिती पुरविणे हा नसून गैरसमज पसरविणे हा असतो (Ankuran Datta June 2020).या काळात अनेक गैरसमज व अफवा व्हायरल झाल्या होत्या त्यापैकी खालील प्रमाणे काही आहेत.

**इस्लामधर्म व कट सिद्धांत.**

या संसर्गजन्य महामारीच्या बाबत जगभर अनेक कट सिद्धांत पसरले होते. वैज्ञानिक माहिती उपलब्ध असतानाही, या महामारीच्या मूळ कारणांबद्दल, लसीकरणाबद्दल, आणि सरकारच्या भूमिकेबद्दल वेगळवेगळ्या शंका आणि अवैज्ञानिक

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

माहिती व अफवा पसरविण्यात आल्या होत्या. काहींचा विश्वास होता की कोरोना विषाणू नैसर्गिकरित्या पसरलेला नसून त्याची निर्मिती प्रयोगशाळेत मुद्दाम करण्यात आली आहे . हा विषाणू चीनमधील वूहानच्या प्रयोग शाळेत तयार करण्यात आला असून तो विषाणू हेतूपुरस्सर पसरविण्यात आला आहे. अशी अफवा पसरली होती परंतु याला कोणतेही वैज्ञानिक पुरावे उपलब्ध झाले नाही (Dr.Naskar SS,Dr.Nags,13 Nov. 2024).
ऑनलाइन प्लटफॉर्मवर अपलोड होणारी आरोग्यविषयक माहिती बरेचदा अफवा आणि कट सिद्धांत द्वारे वाढविले जात असते जी नेहमीच वैज्ञानिक पुराव्यावर आधारित नसते(Lavorgna L, De Stefano M.). अनेकांचा असा समज होता की कोविड-१९ च्या लसी मध्ये वंध्यत्व घटक असतात किंवा इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस (HIV) सारखे रोग पसरवू शकतात . लस टोचल्याने वंध्यत्व निर्माण होते.(Md. Saiful Islam,12May2021).तसेच लसीद्वारे मनुष्याच्या शरीरात चीप बसवल्या जात आहे व त्या चीप च्या साह्याने सरकार नागरिकांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे, अशी देखील अफवा पसरली होती (Mayo Clinic Staff).परंतु अशा अफवांना कोणतेही ठळक वैज्ञानिक पुरवा उपलब्ध नव्हता. या महामारीच्या काळात षडयंत्र सिद्धांताचा प्रचंड प्रसार झाला होता. हा सिद्धांत बहुतेक वेळा अवैज्ञानिक, आधारहीन व समाजाकरिता धोकादायक ठरत होता. या काळात इस्लामीधर्माविरुद्ध खोट्या अफवांचा प्रचार केला जात होता. भारतात कोविड-१९ संसर्गजन्य आजाराच्या उद्रेकानंतर मुस्लिम समुदायावर हल्ले करण्याची आणखी एक संधी उपलब्ध झाली होती. इस्लामिक समुदाया विरुद्ध शारीरिक, मानसिक, शाब्दिक युद्ध छेडले गेले होते. त्यामुळे भारतीय समाजात त्यांच्यावरील बहिष्कार आणखी वाढत गेला(Apoorvandan 18 April 2020).या षडयंत्राचे वर्णन करण्याकरिता "इस्लामोफोबिक हॅशटॅग", "करोना जिहाद", "कोरोना बॉम्ब तबलिगी", कोरोना टेररिझम" हॅशटॅग ट्रेंड होऊ लागले होते. ज्यात मुस्लिमांवर हेतूपुरस्पर विषाणू पसरवल्याचा आरोप केला जात होता.(Hannah Ellis-Peterson, shaikh Azizur Rahman 13 April 2020). दक्षिण दिल्लीतील निजामुद्दीन परिसरात मार्च महिन्याच्या मध्यात तबलिगी जमात या इस्लामिक मिशनरी संघटनेला दिल्लीच्या अधिकाऱ्यांनी मेळाव्याची परवानगी दिली होती. (Hannah Ellis-Peterson, shaikh Azizur Rahman 13 April 2020).या कार्यक्रमाकरिता विदेशातून अनेक मुस्लिम लोक आले होते. त्यातील अनेकांना कोविडची लागण झाली होती आणि त्यांच्या माध्यमातून तो भारतातील इतर शहर व खेड्यामध्ये पसरला होता. मुस्लिम समाजाबद्दल पसरलेल्या अफवा मध्ये एक नवीन अफवा जोडली गेली ती ही की ते मुद्दाम हिंदूंना संख्येने कमी करण्यासाठी भरपूर मुलं जन्माला घालतात आणि हिंदूंच्या देशाला अशुद्ध करतात. त्यांच्यावर भारत मातेचे नुकसान करण्याचा कट रचत असल्याचा आरोप करण्यात येतो. त्यामुळे लोकांना असं पटवणं सोपं झाले की मुस्लिम लोक मुद्दाम कोरोना पसरवत आहेत आणि हिंदूंना त्रास देण्याचा त्यांचा मानस आहे. (-Hannah Ellis-Peterson, shaikh Azizur Rahman 13 April 2020). India Scientist Response To Covid-19 या गटाने असे स्पष्ट केले होते की उपलब्ध आकडेवारीनुसार भारतातील कोरोनाव्हायरस साथी साठी प्रामुख्याने तबलिगी जमात कारणीभूत आहे या अनुमानांला/मताला समर्थन मिळत नाही असे स्पष्ट केलं होते. तबलिगी जमात सदस्यांनी क्वारंटाईन होण्यास नकार दिल्याचा, रुग्णालयातील कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याचा, आणि हिंदू वर लघवीच्या बॉटल्स फेकल्या अशा अफवा पसरल्या होत्या पण नंतर या सर्व बातम्या खोट्या असल्याचे निदर्शनात आले होते(Hannah Ellis -Petersen, Shaikh Azizur Rahman 13 April 2020).अनेकांना तबलिगी आणि इतर मुस्लिमांमध्ये फरक करणे कठीण असल्याकारणाने सर्व मुस्लिमांना या विषाणूचे संभाव्य वाहक म्हणून पाहिले जात होते आणि म्हणूनच त्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता आणि त्यांचा द्वेष केला जात होता. भारत सरकारने देखील या मोहिमेत अति सूक्ष्म पद्धतीने भर घालण्याचा प्रयत्न केला होता. मुख्य प्रवाहातील भारतीय माध्यमांनी असा दावा केला होता की तबलिगी जमातीचे सदस्य हे कोरोना व्हायरसचे "सुपरस्प्रेडर" आहेत. यावरून असे ध्यानात येते की कोरोना महामारीच्या कालावधी मुस्लिम समाजाविरुद्ध षडयंत्र सिद्धांताचा वापर केला होता(Hannah Ellis -Petersen,shaikh Azizur Rahman 13 April 2020).

**९ नंबर**

देशभर लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या पहिल्या टप्प्यात दहाव्या दिवशी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सकाळी नऊ वाजता एक छोटासा व्हिडिओ प्रकाशित केला त्यामध्ये त्यांनी दिलेल्या व्हिडिओ संदेशामध्ये भारतीय जनतेला संबोधित केले होते. त्यात त्यांनी ५ एप्रिल रोजी ठीक ९ वाजता ९ मिनिटांसाठी प्रत्येकाने घरातील लाईट बंद करून त्या ऐवजी मातीचा दिवा, मेणबत्ती, टॉर्च, मोबाईलचा फ्लॅश लाईट लावण्याची आव्हान केले होते. या मागचा पंतप्रधानांचा उद्देश कोरोना योद्धांना त्यांनी केलेल्या कामगारी बद्दल पाठिंबा देणे तसेच सर्व नागरिकांची मानसिक शक्ती वाढवणे हा होता. पण या व्हिडिओ संदेशानंतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अनेक दिशाभूल करणारे संदेश फिरू लागले होते. काही नागरिकांनी या उद्देशाचा विपरीत अर्थ सोशल मीडियावर अपलोड करून अफवा पसरवून त्याचा चुकीचा अर्थ लावला होता. पंतप्रधान मोदींच्या संदेशानंतर जनतेने क्रमांक ९ चा "गूढ शक्ती" तसेच विषाणू नष्ट करण्यास मदत करण्यासाठी त्याची योग्य वेळ याबाबत अनेक सिद्धांत शेअर करण्यास सुरुवात केली होती. त्यात एक अफवा अशी पसरली होती की "नासाच्या संशोधनानुसार कोरोनाव्हायरस उष्ण तापमानात टिकत नाही. आयआयटीच्या प्राध्यापकांच्या मते १३० मेणबत्ती एकत्रित पेटवल्या तर तापमान हे ९ अंशाने वाढते. त्यामुळे रविवारी रात्री ठीक ९.०९ वाजता करोनाव्हायरस मरेल अशी बातमी पसरली होती. परंतु यात प्राध्यापक कोणत्या आयआयटीचा भाग आहे व त्यांचे नाव काय आहे याचा उल्लेख केलेला नव्हता. परंतु वास्तविकतेत नासाने असे कोणतेही संशोधन केलेले नव्हते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते" आतापर्यंतच्या पुराव्यावरून, कोविड-१९ सर्व भागात पसरू शकतो ज्यामध्ये उष्ण आणि दमट हवामान असलेल्या भागांचा देखील समावेश आहे. याचा

अर्थ हवामान कितीही उन्हाचे असो किंवा उष्ण असं तुम्हाला कोरोना व्हायरसचे संसर्ग होऊ शकते. उष्ण हवामान असलेल्या देशांमध्ये कोविड-१९ चे रुग्ण आढळून आले होते( Amanpreet Kaur,3 April 2020).

**भांडी वाजवणे व टाळ्या वाजविणे.**

रविवारी २२ मार्च २०२० रोजी भारतीय जनतेने स्वइच्छेने "जनता कर्फ्यू" म्हणून पाळला होता.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी टीव्हीवरून जनतेला असे आव्हान केले होते की सात वाजल्यापासून १४ तास घरात राहावे कोणीही घराच्या बाहेर पडू नये.(Tiwari V. March 2020). तसेच घरूनच डॉक्टर, परिचारिका आणि आपत्कालीन कर्मचाऱ्यांबद्दल, स्वच्छता कामगाराबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संध्याकाळी पाच वाजता आवाज करून मनोबल वाढविण्याचे आवाहन लोकांना केले होते. (Hindustan Times, March 22, 2020). करोना योद्धांचे मनोबल वाढविण्याकरिता भारतीय जनतेने रविवारी संध्याकाळी पाच वाजता आपल्या अंगणात ,गॅलरीत, पोर्चमध्ये उभे राहून टाळ्या वाजवाव्यात किंवा भांडी वाजवावीत. या मागचा उद्देश करोना योद्धांचे मनोबल वाढविणे हा होता. परंतु पंतप्रधानांच्या मूळ उद्देशाचा भारतीय जनतेने चुकीचा अर्थ लावला व अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने गर्दी केली तसेच जोरजोरात भांडी वाजविण्यास सुरुवात केली. धार्मिक गाणे , भजने गायलीत आणि देशभक्तीच्या घोषणा देत मिरवणूक काढण्यात आली होती. अनेकांनी स्पीकर्सवर वाजवल्या जाणाऱ्या ढोलकीच्या ताल, शंख, घंटा आणि तुतारीचे रेकॉर्डिंग शेअर करून आधीच नियोजन केले होते. काहींनी शनिवारी संध्याकाळी गोंगाटयुक्त तालीम सुद्धा केली होती(Abhirup Roy, March 2020).अशा बिकट परिस्थितीत शासनाने सांगितलेले "सामाजिक दूरत्व" या नियमाचे पूर्णपणे उल्लंघन जनतेने केले होते. या काळात काही लोकांनी असा गैरसमज करून घेतला होता की जोरात टाळ्या वाजवल्याने तसेच भांडे वाजवल्याने आपण कोरोना विषाणूला देशातून बाहेर काढण्यास किंवा नष्ट करण्यास यशस्वी होऊ. यावर सरकारने लगेच ट्विटरवर संदेश पाठवले की कृतज्ञता व्यक्त केल्याने कोविड विषाणूचा प्रसारावर कोणताही परिणाम होणार नाही(Vaibhav Tiwari, India news,March 22,2020).

**गोमूत्र आणि शेण.**

कोविड-१९ या संसर्गजन्य साथीच्या बिकट परिस्थितीत गायीच्या उप-उत्पादनाबद्दल अंधश्रद्धा आणखीनच वाढलेली दिसून आली.गोमूत्र आणि शेंण यांचा उपयोग कोविड या संसर्गजन्य रोगांच्या विषाणूपासून लोकांचे संरक्षण करण्यास उपयुक्त ठरेल असा समज या कालावधीत पसरला होता. ईशान्य कडील आसाम राज्यातील आमदार सुमन हरप्रिया यांनी २ मार्च रोजी विधानसभेच्या अधिवेशनात राज्याच्या कार्यकर्त्यांना सांगितले की, कोविड-१९ वर उपचार करण्यासाठी गोमूत्र आणि शेणाचा वापर केला जाऊ शकतो. यावर तज्ञांनी वारंवार इशारा दिला की गोमूत्र आणि शेण तसेच काही पारंपारिक औषधे कोविड-१९ यासारखे आजार बरे करत नाही(Hindu DW.14/3/2020). अखिल भारतीय हिंदू महासभेच्या गटाचे प्रमुख स्वामी चक्रपाणी यांनी शनिवारी नवी दिल्लीत गोमूत्र पिण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते, या मागचा त्यांचा हेतू गोमूत्र प्राशन केल्याने कोरोनाव्हायरसचा संसर्ग रोखता येईल असा होता. या पार्टीतील ओमप्रकाश यांनी" आम्ही २१ वर्षापासून गोमूत्र पीत आहोत आणि शेणाने आंघोळ देखील करतो त्यामुळे आम्हाला कधीही इंग्रजी औषध घेण्याची गरज वाटली नाही असे वक्तव्य केले होते"(Hindu DW.14/3/2020). गोमूत्र व शेण यांच्यापासून तयार करण्यात आलेल्या औषधीचा वापर केल्यास या संसर्गजन्य विषाणूचा जनतेला संसर्ग होणार नाही अशी अफवा, चुकीची समजूत पसरविण्यात आली होते. "पारंपारिक औषध कोरोनाव्हायरस रोखण्यासाठी काम करते याचे कोणतेही वैज्ञानिक प्रमाण नाही." असे स्पष्ट मत विषाणू शास्त्रज्ञ आणि पारंपारिक औषध संशोधक देबप्रसाद चटोपाध्याय यांनी जर्मनीच्या ड्यूश प्रेस-एजेंटूर वृत्तसंस्थेला सांगितले. गाईचे शेण आणि मूत्र हे टाकाऊ पदार्थ असून अशी कोणतीही चाचणी नाही झाली की हे सिद्ध करते की शेण व गोमूत्र जनतेसाठी चांगले आहे (Hindu DW. 14/3/2020). पश्चिम बंगालमधील हूगडी येथील शेख मोहम्मद अली या ५० वर्षाच्या गृहस्थाने कोरोना विषाणू वर प्रभावी औषध म्हणून गोमूत्र व शेण विकले होते. पोलिसांनी गोमूत्र व शेण विकत असताना त्याला अटक केली (Awasthi, 2020 ).अंधश्रद्धा व गैरसमजुतेचे दुसरे उदाहरण म्हणजे एका स्वयंघोषित ढोंगी बाबांनी सोशल मीडियावर काही व्हिडिओज अपलोड केले होते त्यात त्यांनी गोमूत्र आणि शेणाच्या मिश्रणाने आंघोळ करताना दाखविले होते. करोना हा एक गुप्त रोग आहे व त्याच्यावर अशा प्रकारचा उपचार केल्यास हा संसर्गजन्य होणार नाही असे या व्हिडिओज मध्ये दाखवण्यात आले होते या बाबाच्या भक्तांनी गोमूत्राची पार्टी आयोजित केली होती त्यानंतर पोलिसांनी या पार्टीतल्या अनेक भक्तांना अटक केली.(TRT World 5 July 2021). अशा पद्धतीने केलेले उपचार आरोग्यास हानिकारक ठरू शकतात कारण गोमूत्र व शेणात विषाणू असतात जे इतर आजारांना कारणीभूत ठरतात. मणिपूर मधील किशोरचंद वागंरवेम आणि एरंडोल लेंचोम्बम यांना 13 मे रोजी बीजेपी कार्यकर्त्यांनी त्यांच्या विरोधात तक्रार केली होती त्या अंतर्गत अटक करण्यात आली कारण यांनी गोमूत्र व शेण कोरोना या आजारावर उपयुक्त नाही अशी पोस्ट फेसबुक वर अपलोड .(TRT World 5 July 2021). लोकांनी अशा अफवावर विश्वास ठेवून योग्य उपचार आणि लसीकरणापासून दूर राहणे हा मार्ग निवडला होता पण त्याचा गंभीर परिणाम त्यांच्या आरोग्यावर झाला असे निदर्शनात आले.

**गंगाजल**

काहींनी कोरोना काळात अशा अफवांचे, उपचारांचे समर्थन केले होते की, ज्याला कोणतेही वैज्ञानिक आधार नव्हता. तरीही अशा अफवा सोशल मीडिया द्वारे जनसामान्य लोकांमध्ये पसरविण्यात आल्या होत्या. काही लोकांमध्ये असा समज झाला होता की गंगाजल पिल्याने कोविड-१९ हा संसर्गजन्य आजारा होणार नाही. तर काही लोकांनी असाही दवा केला होता की गंगाजल मध्ये पवित्र आणि रोगनाशक शक्ती असल्यामुळे ते प्राशन केल्याने किंवा त्याच्या वापराने कोरोना पासून स्वतःचा बचाव करता येतो. काही ठिकाणी लोकांनी गंगाजल पिल्याने, अंगाला लावल्याने, गंगाजलाने स्नान केल्याने कोविड जातो असाही अपप्रचार केला होता. अशा प्रकारच्या अफवा लोकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक होत्या. गंगाजल धार्मिक व

सांस्कृतिक दृष्टीने पवित्र मानले गेले असले तरी या संसर्गजन्य आजारावर त्याच्या कोणताही उपाय होणार नव्हता. या प्रमुख गैरसमजुती बरोबरच या व्यतिरिक्त समाजामध्ये अनेक अफवा व गैरसमज पसरलेले होते ते खालील प्रमाणे आहे.
काही लोकांचा असा दावा होता की सार्स-कोविड-२ हा विषाणू ५-G नेटवर्कद्वारे पसरतो अशी अफवा पसरली होती त्यामुळे अनेक ठिकाणी ५-G टॉवर्सची नासधूस करण्यात आली होती (Chinenye Ndulue 4 April 2022).
कोविड-19 वर केवळ पारंपारिक औषधोपचार प्रभावी ठरतात असाही गैरसमज व अफवा पसरली होती. कोमट पाणी, दारू, लहसून, कांदा, आलं, आणि समुद्री शेवाळ या विषाणूच्या संसर्गावर उपयुक्त असल्याचे सांगितले होते(Dr.Naskar,Dr.Nags 13 Nov. 2024).
मलेरियाच्या उपचाराकरिता वापरण्यात येणारे औषध आयव्हरमेक्टिन, क्लोरोक्विनचे सेवन केल्याने हा संसर्गजन्य आजार होणार नाही अशी अफवा पसरली होती त्यामुळे लोकांमध्ये क्लोरोक्विनच्या अति मात्रेच्या सेवन करण्याच्या अनेक प्रकरणे आढळून आले. त्यामुळे जनतेच्या आरोग्य धोक्यात आले होते (Samia Tasnism). कोविड-१९ लसीमुळे कर्करोग होतो, तसेच , रक्ताच्या गुठळ्या किंवा स्ट्रोक होतो. कोविड-२९ लसीचा डी.एन.ए.वर परिणाम होतो. रेडिओ लहरी व मोबाईल नेटवर्कद्वारे कोरोना व्हायरस पसरतो. न्यूमोनिया आणि फ्लू टाळण्याकरिता लस घेतल्यावर कोविड टाळता येतो अशीही खोटी समजत होती (Mayo Clinic Staff).अशाप्रकारे या महामारीच्या काळात अनेक अफवा व गैरसमजुती समाजात पसरल्या होत्या.

**ARMT'#check the fake अभियान.**

कोविड महामारी च्या काळात खोट्या बातम्यांनी समाजात गोंधळ ,अफवा , अंधश्रद्धा तसेच गैरसमज पसरविले होते. अशा परिस्थितीमध्ये डॉ. अनामिका रे मेमोरियल ट्रस्ट (ARMT) या संस्थेने १ एप्रिल २०२० रोजी एक किचन जागृती मोहीम सुरू केली होती. या मोहिमेचा मूळ उद्देश्य खोट्या बातम्या,अफवा या किती घातक ठरू शकतात हे लोकांना समजावून सांगणे हा होता. या काळात सोशल मीडियावर अनेक अफवा गैरसमज अंधश्रद्धा व खोट्या बातम्या झपाटाने पसरविल्या जात होत्या त्या काळात डॉ. अनामिका रे मेमोरियल ट्रस्ट ची मोहीम समाजासाठी उपयुक्त ठरली होती. या मोहिमेने खऱ्या व खोट्या बातम्यांमध्ये फरक ओळखावण्यास जनतेला शिकविले होते. अंधश्रद्धा, खोट्या बातम्या , तर समजते दूर करण्याकरिता या संस्थेचा मोलाचा वाटा आहे.

**निष्कर्ष**

भारतात कोविड-१९ महामारीच्या काळात जनतेमध्ये आजाराविरुद्ध एकसारखे व योग्य वर्तन घडवून आणणे हे एक महत्त्वाची कामगिरी होती. पंतप्रधान मोदी यांनी जेव्हा जनजागृती, शिस्त आणि कोविड योद्धा विषयी कृतज्ञ व्यक्त करण्याचे आवाहन केले होते तेव्हा त्यांचे आव्हान लगेचच अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अंधश्रद्धा व अफवा गैरसमजमध्ये परिवर्तित झाले होते. नियम तोडून श्रध्येच्या नावाखाली लोक एकत्र येताना दिसले परंतु सोशल मीडिया ही एक अशी यंत्रणा आहे की ज्यावर कोणाचेही नियंत्रण नसते. या महामारीच्या काळात सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर नकारात्मक बातम्या, अफवा मोठ्या प्रमाणात पसरविण्यात आल्या होत्या अशा संकटाच्या काळात अफवा , गैरसमजुतींना नष्ट करण्यासाठी नवीन कायदे आणण्याची गरज भासली होती. भारतीय समाजात तर्कशक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे अत्यंत गरजेचे आहे प्रत्येक नागरिकांनी तर्कशक्ती, मानवता आणि शोधवृत्ते वाढवावी त्यामुळे अफवा व गैरसमज लवकर आटोक्यात येतील. परंपरा विश्वास श्रद्धा आदी बाबी महत्त्वाच्या असल्या तरी त्यातून covid-19 सारखे आजार बरे होत नाही त्यासाठी लसीकरण व स्वच्छतेच्या नियमाचे काटेकोर पालन करणे याबाबच अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**संदर्भ.**

Awasthi P.(18march2020) "One Held For Saving Cow Urine And Dung As Cure For Coronavirus.@business line https://www.thehindubusinessline .com/new/natural/one held for sealing.
Amanpreet Kaur (3April,2020) "Social Media User Share Mystical Theory On Number 9 Post PM Modi's", https://www.researchgate.net>publication>35172736.....
Ankuran Dutta (June2020), "Beliefs And Superstitions About Covid-19 : Observation In India Under Lockdown", https://www.researchgate.net>publication>34236497.....
Apoorvandan (18April2020), "How The Coronavirus Outbreak In India Was Blamed On Muslim", https://www.aljazeera.com>.... Caronavirus pandemic.
Chinenye Ndulue (4April2022), "Covid Dodge : Blushing The Myth And Superstitions Around Covid-19". https://blogs.dal.ca.>openthink>covid-dodge-bushing...
Hoffmann Arvid (10may2022),Superstition Beliefs,locus of Control And Feeling at Risk In The Face Of Covid-19", https://pubmed.ncbi.nlm.gov>...
Hindustan Times New Delhi I by HTcorrespondent (22march 2020) "With Clapping Bell Ringing, India Unite To Thank Coronavirus Fighter" https://www.hindustantime.com>Indianews.
Hannah Ellis -Petersen, and Sheikh Azizur Rahman, (13April2020), "Coronavirus Conspiracy Theories Targeting Muslim Spread In India", https://www.thegurdian.com>world
Hindu DW. Group Host cow urine drinking party to ward of coronavirus 2020". https://www.cow/on/hidu-group

Karmarker A.,Dr.Chattopadhyay "The Manifestation Of Superstition In Terms Of Covid -19". https://archives.palarch.nl.>jov>article>

Mayo clinic staff "Debunking Covid-19 Myth". https://www.mayoclinic.org>in-depth>art-20485720

Md.Saiful Islam et.al (12May2021) "Covid-19 Vaccine Rumours And Conspiracy Theories: The Need For Cognitive Inoculation Against Misinformation To Improve Vaccine Adherence."

Dr.Naskar,Dr.Nags(13nov2024) "Practiced Myth and Superstitious Belief Associated With Covid-19 from Indian Perspective".https://satyapriyaroycollege.in>

Roy Abhirup,(22march,2020) "indian Clap, Ring Bells to Cheer Emergency Workers During Caronavirus Lockdown". https://www.reuters.com>article>world>Indian-clap.

Sohel Daria, Md Rabul Islam (may2021) "The Use Of Cow Dung And Urine To Your Over 19 In India A Public Health Concern".https://pubmed.ncbi.nlm.nih.gov..

Sharma (15April2020)" From Looking For Humans Hair To Filling Wells, People Fill Pray To Superstitious Amid Covid-19 Crisis" https://www..newclick.in/from looking human hairs.

Tasnism Samia "Impact Of Rumours And Misinformations On Covid-19 In Social Media". https://pmc.ncbi.nlm.nih-gov/article/pmc7280809

Tiwari Vaibhav ,(22march2020) "Watch Clapping Waiting Utensils How India Thanked Covid-19 Fighters". https://www.ndtv.com/india-news/..

TRT world is Turkish public broadcast videos 5Jul2021#covid#cow urine
https://trt.world/Facebook

Theodore Samore, et.al.(2023) "Greater Traditionalism Predict Covid-19 Precautionary Behaviour Across 27 Society".
https://www.nature.com/article /41598-023-29655-0#sec10.